**L. C. BILL No. II OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA
LAND REVENUE CODE, 1966.

**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २.**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक ६ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानसभेने दिनांक ९ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९६६ चा महा. ४१. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी ३२४०-१ (२०५—३-२०२६)

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २२अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " उक्त संहिता " असा केला आहे) याच्या कलम २२अ मधील, पोट-कलम (७) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :— १९६६ चा महा. ४१.

"(८) महानगरपालिकेच्या किंवा नगरपरिषदेच्या ज्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींनुसार अंतिम विकास आराखडा अधिसूचित केलेला आहे, अशा क्षेत्रातील समाविष्ट असलेल्या गायरान जमिनी, अशा अंतिम विकास आराखड्यात अशा जमिनींसाठी नेमून दिलेल्या प्रयोजनांसाठी, राज्य शासनाच्या पूर्व परवानगीने, वापरता येतील.". १९६६ चा महा. ३७.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २३० ची सुधारणा.

**३.** उक्त संहितेच्या कलम २३० मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(१) "डाकेने पाठवून," या मजकुरानंतर, "किंवा इलेक्ट्रॉनिक मेल सेवेने" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(२) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, अशी नोटीस, राज्य शासनाने नियमांद्वारे तरतूद केलेल्या अशा नमुन्यात व अशा रीतीने इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक संप्रेषणाद्वारे देखील बजाविता येईल.".

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २.]**

**[महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.]

**[ विधानपरिषदेने दिनांक ६ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**[ विधानसभेने दिनांक ९ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.